IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# महाराष्ट्र राज्यातील स्त्री शेतमजुरांच्या समस्या

**डॉ. ढास डी. के.**

**अर्थशास्त्र विभागप्रमुख**

**प्रमिलादेवी पाटील महाविद्यालय नेकनूर,ता. जि. बीड**

**सारांश :**

ज्या व्यक्ती शेतीच्या लागवडीमध्ये गुंतलेल्या असून ५० टक्क्यापेक्षा अधिक दिवस दैनिक मजुरीवर शेतीमध्ये काम करतात त्यांना 'शेतमजूर' असे म्हणतात. दुसऱ्यांच्या शेतावर काम करणारा शेतमजूर असा सरळ अर्थ शेतमजूर व्यक्तीसंदर्भात काढला जातो. भारतामध्ये लिंगभेदानुसार शेतमजुरांचे पुरुष शेतमजूर, स्त्री शेतमजूर व बाल शेतमजूर असे तीन प्रकार पडतात. स्त्री शेतमजूर हा ग्रामीण व शेती विकासातील महत्वाचा घटक असून देखील त्यांना दुय्यम सामाजिक दर्जा, असंघटितपणा, निकृष्ट राहणीमान, अकुशलता, कमी सौदाशक्ती, मागणी व पुरवठ्यातील असमतोल, कमी वेतन दर, कमी उत्पन्न स्तर, पिळवणूक, गरिबी व दारिद्य, कर्जबाजारीपणा, शिक्षणाचा अभाव, आरोग्य समस्या, धार्मिकता व अंधश्रद्धेचा प्रभाव अशा वेगवेगळ्या सामाजिक व आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्यामुळे त्यांचा विकास होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

**मुख्य शब्द : स्त्री शेतमजूर व समस्या**

**प्रस्तावना :**

शेतीदेखील एक व्यवसाय असल्यामुळे या क्षेत्राचा विकास वेगवेगळ्या घटकांवर अवलंबून असतो. त्यामध्ये हवामान, पर्जन्य या नैसर्गिक घटकांचा तर भांडवल, तंत्रज्ञान, बाजारपेठ व मनुष्यबळ या आर्थिक घटकांचा समावेश होतो. 'मनुष्यबळ' या घटकामध्ये शेतकरी व दुसऱ्यांच्या शेतामध्ये मजुरीवर काम करणाऱ्या शेतमजुरांचा समावेश होत आहे. ग्रामीण विकास व शेती विकासातील शेतमजूर वर्ग हा सर्वात महत्वाचा असून ही आर्थिक मागासलेपणामुळे या वर्गाला सामाजिक दर्जा मिळत नाही. भारतीय शेती हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे तर शेतमजूर हा शेती व्यवसायाचा कणा असल्यामुळे शेतमजुराला विशेष महत्व आहे. तरी देखील आजही शेतमजूर हा घटक दुर्लक्षित राहिला आहे.

भारतातील व महाराष्ट्र राज्यातील शेतमजुरांचे विविध घटकांच्या आधारे वर्गीकरण केले जाते. जमीन धारण क्षेत्रानुसार शेतमजुरांचे भूमिहीन शेतमजूर, सीमांत क्षेत्र धारण करणारे शेतमजूर व किफायतशीर धारणक्षेत्र असलेल शेतमजूर असे प्रकार पडतात तर लिंगभेदानुसार स्त्री शेतमजूर, पुरुष शेतमजूर व बाल शेतमजूर असे शेतमजुरांचे वेगवेगळे प्रकार पडतात. द्वितीय शेतमजूर चौकशी समितीने कामाच्या स्वरूपानुसार कायमस्वरूपी शेतमजूर व नैमत्तिक शेतमजूर अशी शेतमजुरांची विभागणी केली आहे. महाराष्ट्र राज्यात ४९,२४,०३४ पुरुष शेतमजूर तर ५८,९१,२२८ स्त्री शेतमजुरांची संख्या आहे. यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रात पुरुष शेतमजुरांपेक्षा स्त्री शेतमजुरांची संख्या जास्त असून ते अनेक समस्यांने ग्रासलेले आहेत; त्यामुळे स्त्री शेतमजुरांच्या समस्यांचाआढावा घेणे आवश्यक आहे.

**अभ्यासाचे उद्दिष्टे :**

१. राज्यनिहाय स्त्री शेतमजुरांच्या संख्येचा आढावा घेणे.

२. महाराष्ट्र राज्यातील स्त्री शेतमजुरांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

सदरचा संशोधन लेख लिहिण्यासाठी व्दितीय माहितीचा वापर करण्यात आला आहे. व्दितीय माहिती प्राप्त करण्यासाठी विविध अहवाल, पुस्तके, संशोधन लेख, अप्रकाशित प्रबंध, वर्तमान पत्रातील लेख व माहिती तसेच संकेतस्थळांचा वापर करण्यात आला आहे.

**विश्लेषण :**

भारत हा कृषी प्रधान देशअसल्यामुळे शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण जास्त असून त्यामध्ये शेतमजूर मोठ्या संख्येने आहेत. भारतातील राज्यनिहाय पुरुष व स्त्री शेतमजूरांची संख्या खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. १**

**राज्यनिहाय पुरुष व स्त्री व शेतमजुरांची संख्या**

| अ.क्र. | राज्य | पुरूष शेतमजूर | स्त्री शेतमजूर | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | आंध्रप्रदेश | ६४,५३,७४१ | ७३,८४,४११ | १,३८,३२,१५२ |
| २ | अरूणाचल प्रदेश | १०,३२९ | ८,५११ | १८,८४० |
| ३ | आसाम | ८,३२,५०८ | ४,३१,०२४ | १२,६३,५३२ |
| ४ | बिहार | ८७,३०,२५१ | ४६,८७,४९३ | १,३४,१७,७४४ |
| ५ | छत्तीसगड | १२,६२,५५९ | १८,२८,७९९ | ३०,९१,३५८ |
| ६ | गोवा | १५,९७० | १९,८३६ | ३५,८०६ |
| ७ | गुजरात | २५,०९,६५१ | २६,५२,००७ | ५१,६१,६५८ |
| ८ | हरियाणा | ७,१७,१३३ | ५,६१,६८८ | १२,७८,८२१ |
| ९ | हिमाचल प्रदेश | ५५,६५८ | ३८,५१३ | ९४,१७१ |
| १० | जम्मू आणि काश्मिर | १,९०,३३९ | ५६,०८२ | २,४६,४२१ |
| ११ | झारखंड | १४,८५,३२२ | १३,६५,९७५ | २८,५१,२९७ |
| १२ | कर्नाटक | २६,२०,९२७ | ३६,०६,०१५ | ६२,२६,९४२ |
| १३ | केरळ | १०,७८,३५४ | ५,४२,४९७ | १६,२०,८५१ |
| १४ | मध्यप्रदेश | ३५,१८,३६८ | ३८,८२,३०२ | ७४,००,६७० |
| **१५** | **महाराष्ट्र** | **४९,२४,०३४** | **५८,९१,२२८** | **१,०८,१५,२६२** |
| १६ | मणिपूर | ४९,९२८ | ६३,७०२ | १,१३,६३० |
| १७ | मेघालय | ९०,८८८ | ८०,८०६ | १,७१,६९४ |
| १८ | मिझोराम | १२,७७५ | १७,००८ | २६,७८३ |
| १९ | नागालॅन्ड | १५,९८५ | १४,९२२ | ३०,९०७ |
| २० | ओरिसा | २५,८७,१९६ | २४,११,९०८ | ४९,९९,१०४ |
| २१ | पंजाब | ११,०४,१४० | ३,८५,७२१ | १४,८९,८६१ |
| २२ | राजस्थान | १०,५५,३३२ | १४,६८,३८७ | २५,२३,७१९ |
| २३ | सिक्किम | ८,७६२ | ८,२३८ | १७,००० |
| २४ | तमिळनाडू | ४२,५६,३६० | ४३,८१,२७० | ८६,३७,६३० |
| २५ | त्रिपुरा | १,६२,६४० | १,१३,४९२ | २,७६,१३२ |
| २६ | उत्तरप्रदेश | ८२,४५,५९९ | ५१,५५,३१२ | १,३४,००,९११ |
| २७ | उत्तराखंड | १,९०,४९४ | ६९,१८९ | २,५९,६८३ |
| २८ | पश्चिम बंगाल | ५०,८०,२३६ | २२,८२,७२१ | ७३,६२,९५७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | अंदमान निकोबार | ४,०४३ | १,१२६ | ५,१६९ |
| ३० | चंदीगड | ४६१ | १०२ | ५६३ |
| ३१ | दादर नगर हवेली | ५,४२९ | ९,२८६ | १४,७१५ |
| ३२ | दमण दीव | ३४७ | ९७६ | १,३२३ |
| ३३ | दिल्ली | ११,२२४ | ४,५४९ | १५,७७३ |
| ३४ | लक्षद्वीप | ००० | ००० | ००० |
| ३५ | पांडेचेरी | ४२,११७ | ३०,१३४ | ७२,२५१ |
| | **एकूण** | **५,७३,२९,१००** | **४,९४,४६,२३०** | **१०,६७,७५,३३०** |

स्त्रोत :Government of India (2011), Ratio of Female and male work force in agriculture sector, Ministry of, New Labour & Employment Delhi

प्रत्येक राज्यातील शेतीच्या स्वरूपावर त्या राज्यातील शेतमजुरांची संख्या अवलंबून असते. संपूर्ण भारताचा विचार केला तर ५,७३,२९,१०० पुरुष शेतमजूर तर ४,९४,४६,२३० स्त्री शेतमजूर आहेत. महाराष्ट्र राज्यात ४९,२४,०३४ पुरुष शेतमजूर तर ५८,९१,२२८ स्त्री शेतमजुरांची संख्या आहे. यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्र राज्यात पुरुष शेतमजुरांपेक्षा स्त्री शेतमजुरांची संख्या जास्त आहे. त्यामुळे स्त्री शेतमजुरांच्या समस्यांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

**महाराष्ट्र राज्यातील स्त्री शेतमजुरांच्या समस्या**

महाराष्ट्र राज्यात शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर स्त्रिया कार्यरत आहेत. त्यामध्ये काही शेतकरी तर काही शेतमजूर आहेत. स्त्री शेतमजुरांना पुरुष शेतमजुरांच्या तुलनेत जास्त समस्यांना तोंड द्यावे लागते. महाराष्ट्र राज्यातील स्त्री शेतमजूरांच्या समस्या खालीलप्रमाणे दिसून येत आहेत.

**१. शिक्षणाची समस्या**

ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जात असल्यामुळे स्त्री शेतमजुरांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येत आहे. शिक्षणाच्या अभावी स्त्री शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक विकासामध्ये अडचणी निर्माण होत आहेत.

**२. दुहेरी भूमिका**

स्त्री शेतमजुरांना घरगुती कामे पूर्ण करून दुसऱ्यांच्या शेतावरती मजुरी करावी लागते तसेच घरातील मुलांची व वृद्ध व्यक्तींची काळजी घ्यावी लागते. या सर्व गोष्टीमुळे स्त्री शेतमजुरांची शारीरिक व मानसिक ओढाताण होत आहे.

**३. दुय्यम सामाजिक दर्जा**

अलीकडील काळात स्त्री व पुरुष समान मानले जात असले तरी ग्रामीण भागात अजून देखील त्या प्रमाणात समानता प्रस्तापित झालेली नाही. एक तर स्त्री शेतमजूर असल्यामुळे त्यांना समाजात आवश्यक त्या प्रमाणात मान मिळत नाही तसेच घरातील पुरुषांकडून देखील काही प्रमाणात वाईट वागणूक दिली जाते.

**४. गतिशीलतेचा अभाव**

पुरुष शेतमजूर एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी कामासाठी स्थलांतर करू शकतात मात्र मुलांच्या शाळा, कौटुंबिक जबाबदारी, बाहेरील वातावरण या सर्व गोष्टीमुळे स्त्री शेतमजुरांना स्थलांतर करण्यामध्ये अडचण निर्माण होते.

**५. पुरुषांपेक्षा कमी वेतन**

भारतामध्ये वेतनातील भेदभाव दूर करण्यासाठी सन १९७६ मध्ये समान वेतन कायदा लागू केला आहे. तथापि ग्रामीण भागात या कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होत नसल्यामुळे ग्रामीण भागात स्त्री-पुरुष समान काम करत असले तरी स्त्री शेतमजुरांना पुरुषांच्या तुलनेत कमी मजुरी दिली जाते.

**६. आर्थिक परावलंबी**

स्त्री शेतमजूर शेतीवरती कष्ट करून पैसे कमवतात परंतु सदर पैसे खर्च करण्याचा अधिकार त्यांना असत नाही. स्त्री शेतमजुरांचे आलेले वेतन पती, सासू सासरे अथवा कुटुंब प्रमुखाकडे जमा केले जाते व ते त्याचा विनियोग करतात त्यामुळे स्त्री शेतमजूराला आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलबून रहावे लागते.

**७. पिळवणूक होण्याची शक्यता**

स्त्री शेतमजूर गरीब व कामाची गरज असल्यामुळे अन्यायाविरुद्ध आवज उठवत नाही. जमीनदार व मोठ्या शेतकऱ्यांकडून या गोष्टींचा गैरफायदा घेऊन स्त्री शेतमजुरांची पिळवणूक करण्यात येत आहे.

**८. निकृष्ट राहणीमान व आरोग्य**

मिळालेल्या मजुरीतून स्त्री शेतमजुरांना त्यांच्या जीवनावश्यक गरजा चांगल्या पद्धतीने पूर्ण करणे शक्य होत नाही. राहणीमान निकृष्ट दर्जाचे राहत असल्यामुळे त्याचा स्त्री शेतमजुरांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे.

**९. धार्मिक रूढी परंपरेचा पगडा व बंधने**

भारतातील स्त्री शेतमजुरांमध्ये धार्मिक रूढी परंपरेचा मोठ्या प्रमाणावर पगडा आहे तसेच त्यांच्यावर अनेक सामाजिक बंधने देखील असल्यामुळे स्त्री शेतमजुरांचे जीवन दु:खमय असल्याचे दिसते. तसेच धार्मिक रुढींचे पालन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात येतो.

**१० हंगामी बेरोजागरी**

पुरुष शेतमजुरांना वेगवेगळ्या कामासाठी मागणी असते परंतु स्त्री शेतमजुरांना लागवड, खुरपणी व काढणी यासाठी मोठ्या प्रमाणावर मागणी असते. परंतु हा विशिष्ट कालावधी संपल्या नंतर स्त्री शेतमजुरांना हंगामी बेकारीला तोंड द्यावे लागते.

**११. कामगार योजनांच्या माहितीचा अभाव**

भारतातील महिला शेतमजूर मोठ्या प्रमाणावर अशिक्षित असल्यामुळे त्यांना शेतमजुरांच्या विकासासाठी असलेल्या योजनांची माहित होत नाही त्यामुळे त्या सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागास राहतात .

**१२. खाजगी कर्जाचा बोजा**

स्त्री शेतमजूर आपल्या पायाभूत गरजा पूर्ण करण्यासाठी खाजगी मार्गाने उच्च व्याज दराने कर्ज घेतात त्यामुळे त्यांच्यावर कर्जाचा बोजा वाढत आहे.

महाराष्ट्र राज्यात स्त्री शेतमजुरांच्या संख्येत वाढ झाली आहे परंतु शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा झालेली नाही. ग्रामीण भागातील महिला घरातील काम, आपल्या जनावरांची व्यवस्था व मुलांची काळजी या सर्व गोष्टी पूर्ण करून शेतमजुरी करत असल्यामुळे त्यांची शारीरिक व मानसिक ओढताण होत असते. तसेच कमी महत्वाचे स्थान, आर्थिक निर्णय घेण्याचे स्वतंत्र नसणे, पुरुषांपेक्षा कमी वेतन, कामाच्या ठिकाणी शारीरिक व मानसिक छळ, पुरुषांचे वर्चस्व या सारख्या आर्थिक व सामाजिक समस्यांना स्त्री शेतमजुरांना तोंड द्यावे लागत आहे. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी त्या भागातील स्त्री शेतमजुरांचा विकास करणे आवश्यक आहे व त्यासाठी शासनाने व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे अपेक्षित आहे. स्त्री शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी असलेल्या कायद्यांची योग्य अंमलबजावणी, स्त्री शेतमजुरांसाठी नवीन कायदे व योजनांची निर्मिती, सामाजिक व कौटुंबिक स्तरात बदल, स्त्री शेतमजुरांना आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य व वेतनातील तफावत दूर करण्याची गरज व्यक्त केली आहे.

**संदर्भ**

१. नाडगोंडे जी.डी. (१९९७), ग्रामीण समाजशास्त्र, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे

२. Tripathi S.N.(2005), Agricultural Labour in India, Mohit Publication, New Delhi

३. कायंदे पाटील जी.वि. (२००३), कृषी अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन्स्, नाशिक

४. Government of India (2011), Ratio of Female and Male Work Force in Agriculture Sector, Ministry of Labour & Employment, New Delhi

५. Lal R.& Khurana A.(2011), Gender Issues:The Role of Women Agriculture Sector, ZENITH International Journal of Business Economics &Management Research (1)1

६. दूर्गे ए. ए. (२०१३), नागपूर जिल्ह्यातील शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचे अध्ययन, इंडियन स्ट्रीम रिसर्च जर्नल, ३(९)

७. हिंगे एम. जी.(२०१७), महाराष्ट्रातील शेती व्यवसायात महिलांचे योगदान: एक अभ्यास, पीएच.डी. प्रबंध, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

८. सांगवान ए. एस. (२०१८), खेतीहर मजदूर : दशा व दिशा, शोधमंथन (३)

९. बाबर एन. (२०१९), महिलांचे शेतीतील दूर्लक्षित योगदान, भूसंवर्धन, सांगली.

१०. ढोबळे जी. एन.(२०२०), ग्रामीण महिला शेतमजूर समस्या व उपाय, जर्नल ऑफ इमरजिंग इनोव्हेशन रिसर्च, (१०)२

११. Kalyani M.(2016), Indian Agricultural Labour Policy, Prospects & Problem, International Journal of Social Science Relevance& Concern (4)2

१२. गायकवाड बी. आर. व हिंगे एम. जी.(२०१८), महाराष्ट्रातील शेती व्यवसायात महिलांची भूमिका व कामाचे स्वरूप, IDEAL International Multidiciplinary Reasearch Journal (VI) II